महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा MHADA

==========================================================================

जावक क्रमांक – ७६५/६०                                  दिनांक :- ०२ मे, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात 'म्हाडा'कडे प्रत्यक्ष जमा रु. ११,३३४.५१ कोटी

मुंबई, दि. ०२ मे, २०२५ : - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे (म्हाडा) सन २०२३-२४ मध्ये प्रत्यक्ष जमा रु. ८,११३.८८ कोटी होती. सन २०२४-२५ मध्ये प्रत्यक्ष जमा रु. ११,३३४.५१ कोटी एवढी झाली असून सन २०२३-२४ च्या तुलनेत सन २०२४-२५ मध्ये म्हाडाच्या जमा रकमेत रु. ३,२२०.६३ कोटींची वाढ म्हणजेच ३९.६९ टक्के वाढ झाली आहे.

सन २०२४-२५ मध्ये महसुली जमेपोटी रु. ५००० कोटी प्राप्त झालेले आहेत. यामध्ये चटई निर्देशांक (एफएसआय), गुंतवणुकीवरील व्याज, इमारत परवानगी शुल्क, भाडे व सेवा आकारापोटी मिळणाऱ्या रकमांचा समावेश आहे. भांडवली जमेपोटी रु. १७०० कोटी प्राप्त झालेले आहेत. यामध्ये म्हाडाच्या विविध मंडळांकडून सोडतीद्वारे घरांच्या विक्री, विक्री अभावी पडून असलेल्या गाळ्यांच्या विक्रीसाठी विशेष योजना राबवून त्यातून प्राप्त झालेल्या रकमांचा समावेश आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळास जिल्हा नियोजन कार्यालयाकडून रु. २२०० कोटी प्राप्त झालेले आहेत.

'म्हाडा'ने विविध योजनांसाठी शासनाकडे अर्थसहाय्य म्हणून रु. २,३५० कोटी व आतापर्यंत म्हाडाने शासनास दिलेल्या कर्जाच्या प्रतिपूर्तीसाठी रु. १,०५० कोटी असे एकूण रु. ३,४०० कोटींची मागणी केली होती. यापैकी शासनाने 'म्हाडा'ला अर्थसहाय्य म्हणून एकूण रु. रु. १७५८.६० कोटी दिले आहेत.

###

मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

------------------------------------------------------------------------------------------

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================

Outward No. : 765/60 Dt. May 2, 2025

Press Release

**MHADA Receives ₹11,334.51 Crores in Actual Receipts for the Financial Year 2024–25**

Mumbai, May 2, 2025 – The Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) recorded actual receipts of ₹8,113.88 crores in the financial year 2023–24. For the financial year 2024–25, MHADA has received ₹11,334.51 crores, marking an increase of ₹3,220.63 crores over the previous year – a growth of 39.69%.

Out of the total for 2024–25, ₹5,000 crores have been received under revenue receipts. This includes income from Floor Space Index (FSI) premiums, interest on investments, building permit fees, rent, and service charges. ₹1,700 crores have been received under capital receipts. This includes income from the sale of houses via lotteries conducted by various MHADA boards and from special schemes aimed at selling unsold commercial units.

Additionally, the Mumbai Slum Improvement Board has received ₹2,200 crores from the District Planning Office.

MHADA had requested a total of ₹3,400 crores from the government – ₹2,350 crores as financial assistance for various schemes, and ₹1,050 crores for the repayment of loans previously given to the government. Of this, the government has provided MHADA with a total financial assistance of ₹1,758.60 crores.

###

Chief Public Relations Officer / MHADA